आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

सोमवार, दिनांक : १६ सप्टेंबर, २०२४

ठळक बातम्या

1. नागपूर सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेसला पंतप्रधानांनी दाखवली हिरवी झेंडी; नागपूर रेल्वे स्थानकावरील कार्यक्रमात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती.
2. देशभरात उद्यापासून 2 ऑक्टोबर गांधी जयंतीपर्यंत 'स्वच्छता ही सेवा' अभियानाला सुरूवात.
3. राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नागपूरच्या कोराडी येथे अगरबत्ती युनिटचे उद्घाटन ; महिलांना फुडस्टॉल्स आणि धनादेशांचे वितरण.
4. आज ईद - ए - मिलाद - उन -नबी उत्साहात साजरी
5. उद्या होणाऱ्या लाडक्या बाप्पाच्या विसर्जनाची तयारी अंतिम टप्प्यात, पर्यावरण पूरक विसर्जनावर भर.

**वंदे भारत**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नागपूर रेल्वे स्थानकावरून नागपूर-सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला. ही रेल्वे आज संध्याकाळी नागपूर वरून सेवाग्राम, चंद्रपूर, बल्लारशा रामगुंडम आणि काझीपेठ असा प्रवास करून रात्री सिकंदराबाद येथे पोहोचणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदाबाद येथे आयोजित एका कार्यक्रमातून या वंदे भारत ट्रेनला तसेच पुणे-हुबळी आणि कोल्हापूर पुणे मार्गाचा समावेश असलेल्या वंदे भारत ट्रेनला हिरवी झेंडी दाखवली.

महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे नागपूर-सिकंदराबाद या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी नागपूर रेल्वे स्थानकावर आयोजित कार्यक्रमात उपस्थित होते. नागपुरातील अजनी आणि नागपूर रेल्वे स्टेशनचा विकास त्याचबरोबर जनतेमध्ये लोकप्रिय असलेल्या वंदे भारत ट्रेन्सची आता नागपुरात उपलब्धता यासाठी आपण आणि पंतप्रधानांचे आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे नागपूरच्या जनतेच्या वतीने आभार मानतो असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी सांगितले. रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढल्यामुळे त्या क्षेत्रात आर्थिक विकासाला चालना मिळते असे मत राज्यपालांनी यावेळी मांडळे. यानंतर पंतप्रधानांच्या अहमदाबाद येथील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले नागपूर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक ८ वर झालेल्या या कार्यक्रमाला मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे अधिकारीही उपस्थित होते

विदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाची, नागपूर-सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेस नागपूर आणि सिकंदराबाद दोन औद्योगिक शहरांना जोडेल. नागपूर-हैदराबाद वंदे भारत एक्स्प्रेसची मागणी चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी रेल्वे मंत्री आश्विनीकुमार वैष्णव यांना केली होती. आज चंद्रपूर इथं सायंकाळी ६ वाजून २० मिनिटांनी आणि बल्लारशाह रेल्वे स्थानकावर सायंकाळी ६ वाजून ४० मिनिटांनी नागपूर-सिकंदराबाद या वंदे भारत एक्सप्रेसचे स्वागत करण्यात येणार आहे. अतिजलद अत्याधुनिक आणि आरामदायक वंदे भारत एक्सप्रेस ही २० डब्यांची राहणार आहे. नागपूर ते सिकंदराबाद हे ५७८ किलोमीटर अंतर ताशी १३० किमी वेगाने पार करेल. नागपूर ते सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेसला एकूण पाच थांबे देण्यात आले आहेत. वंदे भारत एक्सप्रेस नागपूर येथून सुटल्यानंतर सेवाग्राम, चंद्रपूर, बल्लारपूर, रामगुडंम, काजीपेठ येथील प्रवाशांना घेऊन सिकंदराबाद येथे पोहोचणार आहे. या रेल्वे मार्गामुळे महाराष्ट्र आणि तेलंगणा मधील कमी वेळात अंतर कापणे ही शक्य होणार आहे.

**स्वच्छता ही सेवा**

देशभरात उद्यापासून 'स्वच्छता ही सेवा' अभियानाला सुरूवात होत आहे.हे अभियान गांधी जयंतीपर्यंत म्हणजेच दोन ऑक्टोबर पर्यंत सुरू राहाणारआहे. 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' ही या वर्षीच्या अभियानाची मुख्य संकल्पना आहे. या अंतर्गत लोकसहभागातून श्रमदान आणि सामूहिक कार्याच्या माध्यमातून पर्यटनस्थळं, सार्वजनिक इमारती, व्यावसायिक परिसर, जलाशय, प्राणीसंग्रहालय, अभयारण्य आणि सार्वजनिक स्वच्छतागृह सारख्या ठिकाणी स्वच्छता मोहिम राबवण्यात येणार आहेत. सर्व केंद्रीय तसच राज्य मंत्रालयं लोकसहभागातून विविध योजना राबवणार आहेत. संपूर्ण समाजाचा विचार करण्याचा दृष्टीकोन बाळगून स्वच्छता लक्ष्य विभाग, श्रमदान उपक्रम-स्वच्छतेमध्ये लोकसहभाग आणि स्वच्छतामित्र सुरक्षा शिबिर हे तीन घटक या मोहिमेचे प्रमुख आधारस्तंभ असतील. या अभियानात देशभरातले नागरिक, उद्योग, स्वयंसेवी संस्था, विकास संस्था यांसह विविध स्थानिक स्वराज्य संस्थाना सहभागी करुन घेण्यात येणार आहे.

**आदिती तटकरे**

नागपूरच्या कोराडी इथल्या जगदंबा महालक्ष्मी मंदिर परिसरात महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते अगरबत्ती युनिटचे उद्घाटन झाले. कोराडी इथल्या अगरबत्ती युनिटच्या माध्यमातूनही महिलांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचे सांगत त्या महिलांच्या उत्पादनाची ऑनलाइन विक्री करण्यासाठी 'यशस्विनी पोर्टल'वर नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. महिला आर्थिक विकास महामंडळ नागपूरद्वारे संचालित व जिल्हा नियोजन विभागाच्या नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत अर्थ सहाय्यातून 10 प्रातिनिधिक फिरत्या फूड स्टॉलचे आदिती तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्यांच्या हस्ते आयसीआयसीआय बँक आणि एचडीएफसी बँकाकडून महिला बचत गटांना देण्यात आलेल्या कर्जाचे धनादेश प्रातिनिधिक रित्या वितरीत करण्यात आले.

यानंतर आयोजित ‘मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजना, महिला सशक्तीकरण मेळाव्याला त्यांनी संबोधित केलं. यावेळी आमदार चंद्रशेखर बावनकुळे आणि  टेकचंद सावरकर यांची उपस्थिती होती. 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेतील जवळपास 30 लाखांचा आर्थिक लाभ 'नागपूर महिला सन्मान सहकारी पतसंस्थेत' जमा करून या योजनेच्या निधीचा योग्य विनियोगाचा आदर्श वस्तूपाठ नागपूर जिल्ह्यातील महिलांनी घालून दिला आहे.संपूर्ण महाराष्ट्रात या योजनेसंदर्भातील हा ‘नागपूर पॅटर्न’ म्हणून प्रसिद्ध होईल, असा विश्वास महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या टप्पा दोन अंतर्गत 31 ऑगस्टला 52 लाख महिलांच्या बँक खात्यात लाभ जमा करण्यात आला आहे. नागपूर जिल्ह्यातील 3 हजार महिलांनी एकत्र येत नागपूर महिला सन्मान सहकारी पतसंस्थेत 1500 पैकी 1000 रुपये असे  जवळपास 30 लाख रूपयांचे भांडवल उभारले आहे.या योजनेच्या नोंदणीसाठी सप्टेंबर महिन्यात अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचेही  तटकरे यांनी सांगितले.

**ईद-ए-मिलाद**

देशभरात आज ईद - ए - मिलाद - उन - नबी उत्साहात साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषित मोहम्मद पैगंबरांनी प्रत्येकाला प्रेम आणि बंधुत्वाच्या भावनांना बळ देण्यासाठी प्रेरित केलं, त्यांनी समाजात दया, मानवतेचा प्रसार केला असं सांगून राष्ट्रपतींनी मुस्लीम समुदायाला पवित्र कुराणातली शिकवण आत्मसात करण्याचं आवाहन केलं. प्रेषित हजरत मोहम्मदांची मानवता आणि बंधुभावाची शिकवण निरंतर जगाला मार्गदर्शन करीत राहील असं उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. देशातला सद्भाव आणि एकजूट नेहमी कायम रहावी आणि सर्वत्र आनंद आणि समृद्धी नांदावी, अशी आशा पंतप्रधानांनी आपल्या संदेशातून व्यक्त केली.

दरम्यान ईद - ए - मिलाद नीमित्त **नागपूर** शहरात विविध ठिकाणी कृतज्ञता रैली चे आयोजन करण्यात आले असुन या रॅल्लीत लहान मुले, नागरीक  सहभागी झाले आहे.या मिरवणुकीचे समाजाच्या  विविध संस्था संघटनांकडून स्वागत केले जात आहे. ईद - ए - मिलाद नीमित्त मुस्लीम बांधवांनी आपल्या घरांवर आणी धार्मिक ठिकाणांवर आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. मुस्लीम बांधवांकडून हजरत मोहम्मद यांचा पवित्र वचनांचे, कुराणाचे पठण केले जात आहे.

**वाशिम** जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी ईद-ए-मीलादच्या मिरवणुकी शांततेत निघाल्या असून मालेगाव तालुक्यातील शिरपूर येथे ईद ए मिलादची  मिरवणूक डीजे मुक्त निघाली आहे.

**विसर्जन विशेष**

दहा दिवस चाललेल्या गणेशोत्सवाची उद्या सांगता होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्वत्र गणेश विसर्जनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. अशात **नागपूर** महानगरपालिकाद्वारा आमदार प्रवीण दटके यांच्या विशेष आमदार निधीतून चिटणीस पार्क महाल येथे 12 कृत्रिम

टँक ची व्यवस्था करण्यात आली आहे. हे टँक आंतरराष्ट्रीय दर्जाचे असून, जर्मनी येथून आले आहेत. नवव्या व दहाव्या दिवसाच्या श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी मनपा सज्ज असून, शहरातील २०९ ठिकाणी ४१९ कृत्रिम टँकची व्यवस्था करण्यात आली आहे. नागपूर मनपाद्वारे गणेश भक्तांच्या सोयीनुसार शहरात ४१९ विसर्जन टँकची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय सेट्रिंगचे ३३१, रबरीचे ३१, खड्डे करून ३२, कॉक्रीटचे ३ आणि फिरते २२ टँक ची सोय करण्यात आली आहे.

लाडक्या गणरायाला उद्या वाजत- गाजत निरोप देण्यात येणार आहे. बाप्पाच्या विसर्जनाकरिता **अकोला** महापालिकेची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. महापालिकेने विसर्जनासाठी 600 कर्मचाऱ्यांच्या विविध ठिकाणी नियुक्ती केल्या आहेत. यासोबतच निर्माण संकलनासाठी आठ कचरा घंटागाड्या सज्ज ठेवल्या आहेत. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार गणेश मूर्ती संकलनासाठी 20 ट्रक, चार टेम्पो ट्रक, चार पाण्याचे टँकर अशी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. महापालिकेचे अग्निशमन दलाचे जवानही विसर्जन स्थळी तैनात करण्यात आले असून विद्युत विभागाकडून विसर्जन ठिकाणी मोठी लाइटिंग व्यवस्था केली आहे.

**हवामान**

आज पासून ते २० सप्टेंबर पर्यंत नागपूर सह विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात हलक्या ते अत्यंत हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या दरम्यान सर्व जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडू शकतो. याशिवाय हवामान सर्वसामान्य राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवला आहे.

#####